**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १२७/२०१९ मधील निशाणी क्र. १७ वरील आदेश</u>**

**( कचराबाई शेजवळ व इतर वि. चंद्रभागाबाई पार्टे व इतर)**

MHNS230020562019

सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १ चंद्रभागाबाई गजानन पार्टे यांचे विरुध्द दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होण्याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्ज व प्रतिवादी क्र. २ चे म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांच्या विव्दान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. प्रकरणाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा खरेदीखत रदद करण्यासाठी व इतर बाबींसाठी दाखल केला आहे. दाव्याचे समन्स प्रतिवादी क्र. १ ला बजावणीसाठी पाठविले असता त्यावरील अहवालावरुन प्रतिवादी क्र. १ दावा दाखल करणेपुर्वीच म्हणजेच दि.०९/१२/२०१० रोजी मयत असल्याचे दिसून येते. त्यामूळे प्रस्तुत दावा वादीने मयत व्यक्तीविरुध्द दाखल केलेला आहे. दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ मयत झाली असती तर तिचेविरुध्द दावा अवसायन पावला असता. परंतु तशी परीस्थिती नसल्यामूळे प्रतिवादी क्र. १ विरुध्द दावा अवसायन पावला आहे असे म्हणता येणार नाही. त्यामूळे प्रस्तुत अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY

Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2025.11.15 11:42:02 +0530

( मो. द. ननवरे )

**सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इगतपुरी.**

स्थळः— इगतपुरी

दिनांकः— १४/११/२०२५